| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doecentralize11state@gmail.com

**परिपत्रक**

क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२३/3003
दिनांक-१६/०६/२०२३

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर

**विषय:- इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**
इ.१०वी श्रेणी/गुणपत्रके, गुणवत्ता यादी, ATKT प्रवेश, दिव्यांग विद्यार्थी प्रवेश, Transfer of Credits, इत्यादी बाबी विचारात घेऊन विद्यार्थ्यांचे अर्ज Verify करणे व प्रवेश कार्यवाही बाबत मार्गदर्शक सूचना

**संदर्भ:- १.शासन पत्र क्र.प्रवेश-०४२२/प्रक्र.४१/एसडी-२ दिनांक.२३/०६/२०२०**
**२.राज्यस्तर इ.११वी प्रवेश नियंत्रण समिती बैठक दि.१३/०६/२०२३**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका या पाच महानगर क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत. विविध शिक्षण मंडळांचे इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थी सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होत आहेत, काही मंडळाचे गुणपत्रकातील श्रेणीचे गुणांमध्ये रुपांतर करणे आवश्यक आहे. इ.११वी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याचे अचूक Verification करता यावे व संपूर्ण प्रवेश प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी शासन / राज्यमंडळाचे निकष तसेच इतर प्रचलित बाबीचे अनुषंगाने पुढील सूचनांचे पालन करावे व इ.११वी प्रवेश प्रक्रियेबाबत प्रत्येक घटकाने दिलेल्या कालमर्यादेत व तत्पर कार्यवाही करावी.

**इ.११वी )प्रत्येक प्रवेश फेरीचे ढोबळ नियोजन असे असेल.**

| टप्पे | | CAP कार्यवाही | Quota प्रवेश | | Bifocal कार्यवाही | After Admission |
|---|---|---|---|---|---|---|
| APPLY | १ | पसंतीक्रम देणे | पसंती देता येईल | | पसंती नोंदविणे | Monitoring by |
| Data Process | २ | List by System | List by Jr College | | List by Jr.College | Vocational |
| ADMISSION | ३ | प्रवेश निश्चित करणे | प्रवेश निश्चित करणे | | प्रवेश निश्चित करणे | Office |

सदर परिपत्रक इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ साठी जारी करणेत येत आहे. इ.११वी प्रवेश प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर करावयाची कार्यवाही, घ्यावयाची दक्षता इत्यादी बाबत मार्गदर्शक सूचना सोबत संलग्न आहेत, सदर बाबी सर्व संबंधितांचे निदर्शनास आणाव्यात

(प्रसाद कालगावकर)
सहायक संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

# इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४

**मार्गदर्शक सूचना** **दिनांक.१६/०६/२०२३**

| क्र | बाब | इ.११वी प्रवेशाची कार्यपद्धती तपशील |
|---|---|---|
| १ | सर्वोत्तम पाच विषयांचे गुण. Best Five तरतूद. | १. सर्वोत्तम पाच विषयांचे गुण ग्राह्य धरण्याची (Best Five) तरतूद, केवळ महाराष्ट्र राज्यमंडळाच्या Fresher/ एका प्रयत्नात १०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना लागू आहे.<br>२. सी.बी.एस.ई. मंडळाच्या गुणपत्रकातील अतिरिक्त विषय सोडून इतर पाच मुख्य विषयांचे एकूण गुण ग्राह्य मानण्यात येतील.<br>३. आय.सी.एस.ई. मंडळासाठी शासन पत्र दि.२९/०६/२०१९ नुसार दिलेल्या कार्यपद्धती प्रमाणे एकूण गुण मोजण्यात येतील.<br>४. सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. व आय.जी.सी.एस.ई. या मंडळांचे गुणांची योग्य गणणा होण्यासाठी Calculate करण्याची तरतूद पोर्टलवर देण्यात आलेली आहे.<br>५. अन्य मंडळांचे गुणपत्रकात नमूद केलेल्या सर्व विषयांचे एकूण गुण ग्राह्य माणले जातील. |
| २ | निकाल ऑनलाईन जाहीर झालेला आहे परंतु मंडळाकडून इ.१०वी गुणपत्रके प्राप्त नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी. | १. ज्या परीक्षा मंडळांचे निकाल विलंबाने जाहीर होतात अशा विद्यार्थ्यांना इ.१०वी निकाल जाहीर झाल्यानंतर त्या-त्या वेळी प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर ऑनलाईन अर्ज भरुन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल.<br>२. निकाल जाहीर झालेनंतर मूळ गुणपत्रक मिळणेस विलंब होणार असल्यास संबंधित परीक्षा मंडळाकडून ऑनलाईन प्राप्त झालेली गुणपत्रके ग्राह्य समजण्यात येतील. त्यासाठी, अशा विद्यार्थ्यांनी गुणांचा तपशील DigiLocker वर उपलब्ध असल्यास त्याची प्रत घेऊन अपलोड करावी अथवा मंडळाच्या पोर्टलवरुन मिळणारी प्रत आपल्या माध्यमिक शाळेकडून प्रमाणित करुन घ्यावी व ती अपलोड करावी. |
| ३ | इ.१०वी परीक्षेमध्ये किमान एक भाषा व इतर ऐच्छिक विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत. | **१. राज्यमंडळाच्या इ.११वी मध्ये प्रवेश मिळण्यासाठी इ.१०वी/ समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह, किमान पाच विषयांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.**<br>२. शासन निर्णय दि.०८/०१/२०१६ अन्वये दिव्यांग विद्यार्थ्यांना एक भाषा विषय अनिवार्य व इतर कोणतेही पाच विषय घेऊन इ.१०वी परीक्षेमध्ये बसणेस परवानगी देण्यात आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांना इ.११वी प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल. परंतु,<br>३. ज्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषय न घेता इ.१०वी उत्तीर्ण केलेली आहे अशा विद्यार्थ्यांना शासन पत्र दि.१३/०७/२०१५ नुसार ATKT विद्यार्थ्यांप्रमाणे सवलत लागू आहे.<br>४. अशा विद्यार्थ्यांनी पुढील वर्षात इ.१०वी चा इंग्रजी विषय स्वतंत्रपणे (Isolated) घेऊन लगतच्या सलग दोन परीक्षांच्या संधीत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. इंग्रजी विषय उत्तीर्ण होईपर्यंत त्यास इ.११वी चा निकाल दिला जाणार नाही व तोपर्यंत असे विद्यार्थी इ.१२वी मध्ये प्रवेशास पात्र असणार नाहीत. |
| ४ | इ.१०वी गुणपत्रिकेमध्ये (KSA) Transfer of Credit. आणि Pass with Transfer of Credits असे नमूद करुन उत्तीर्ण घोषीत करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे इ.११वी प्रवेशाबाबत. | **१. इ.११वी विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याने इ.१०वी परीक्षेत विज्ञान आणि तंत्रज्ञान विषय उत्तीर्ण केलेला असणे अनिवार्य राहील.**<br>२. शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ नुसार **"कौशल्य सेतू"** अंतर्गत इ.१०वी गुणपत्रकात Pass with Transfer of Credits असा शेरा असणारे व इंग्रजी विषयासह किमान पाच विषयांत इ.१०वी/ समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणारे विद्यार्थीही इ.११वी प्रवेशासाठी पात्र आहेत. तथापि,<br>३. गणित विषयासाठी Transfer of Credit घेऊन इ.१०वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास इ.११वी मध्ये गणित विषय घेता येणार नाही<br>४. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज तपासतांना इ.१०वी गुणपत्रिकेमध्ये KSA वगळून जेवढया विषयांचे गुण दर्शविलेले असतील त्यांची एकूण करुन त्याचे रुपांतर ५०० पैकी करण्यात यावे व सदर गुण हे इ.११वी प्रवेश प्रकियेसाठी ग्राह्य धरावेत. |
| ५ | विद्यार्थ्यांचे इ.१०वी गुणपत्रकामध्ये अतिरिक्त गुण नमूद होणे अथवा पुनर्तपासणी मध्ये गुणांमध्ये बदल झाल्यास करावयाची कार्यवाही. | १. इ.१०वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे गुण व इतर माहिती विद्यार्थी अर्ज भरतांना घेण्यात आलेली आहे. परंतु त्यानंतर काही विद्यार्थ्यांना शिक्षण मंडळाकडून अतिरिक्त गुण दिले गेल्यास अथवा पुनर्तपासणी मध्ये त्यांचे गुणांमध्ये बदल झाल्यास. अशा विद्यार्थ्यांचे बाबतीत सुधारित गुणांची नोंद करण्याची सुविधा पोर्टलवर शिक्षण उपसंचालक लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे.<br>२. विद्यार्थ्यांनी त्यांचे सुधारित गुणपत्रक, Grievance द्वारे दुरुस्तीसाठी ऑनलाईन पाठवावेत. त्यानुसार अचुक गुण नोदवून सुधारित गुणपत्रक अपलोड करावे, त्यानुसार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी ऑनलाईन दुरुस्ती करावी. सदर कार्यवाही गुणवत्ता यादी अंतिम करणेपूर्वी होणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६ | आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी इ.११वी प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करणे. | **१. सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातीचा दाखला सादर करणे आवश्यक असेल. विद्यार्थ्यांचा स्वत:चा जातीचा दाखला अद्याप मिळाला नसल्यास वडीलांचा जातीचा दाखला ग्राह्य धरता येईल.**<br>**२. EWS प्रवर्गाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले EWS प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**<br>**३. VJ-NT, OBC, SBC प्रवर्गांतील विद्यार्थ्यांना** प्रवेशासाठी जातीच्या दाखल्यासोबत उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे Non-Creamy Layer (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>**टीप- ज्या विद्यार्थ्यांच्या (कोणत्याही कारणाने) NCL प्रमाणपत्र मिळणारच नसेल अशा विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज भरणे योग्य आहे.** |
| ७ | प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करणेची सुविधा. | इ.११वी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांने भरलेल्या प्रवेश अर्जातील माहितीची पडताळणी मार्गदर्शन केंद्रांमार्फत करुन अर्ज Verify केला जातो. आवश्यक प्रमाणपत्रे पोर्टलवर अपलोड केल्यामुळे अर्ज त्वरीत ऑनलाईन Verify करणे शक्य होते. सबब आवश्यक सर्व प्रमाणपत्रे अपलोड करणेची सुविधा पोर्टलवर विद्यार्थी लॉगीन मध्ये दिलेली आहे.<br>टीप- एखाद्या विद्यार्थ्याचा अर्ज Auto Verify झाला असल्यास असे अर्ज Verify करुन घेण्याची आवश्यकता नाही.<br><br>**विद्यार्थ्याने पुढील प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.**<br>**अ) प्रवेश अर्ज भाग-१ भरतेवेळी- Upload**<br>१. सामाजिक / वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी-<br>स्वत:चा जातीचा दाखला, तो नसल्यास वडीलांचा जातीचा दाखला.<br>२. EWS आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी-<br>आर्थिक दुर्बल घटक EWS प्रमाणपत्र (पालक व पाल्याचे नाव)<br>२. समांतर/ विशेष आरक्षणाचा लाभ हवा असल्यास तसे प्रमाणपत्र (स्वत:चे).<br>३. माहिती अचूक भरलेबाबत स्वयं घोषणापत्र (Undertaking).<br>४. विद्यार्थ्याचे इयत्ता.१०वी चे गुणपत्रक. (राज्यमंडळाचे Fresher वगळून)<br>*** कोणती प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे याचा तपशील अर्ज भरतांना पोर्टलवर दर्शविला जातो. एखाद्या विद्यार्थ्यास अपलोड ऑप्शन आला नसल्यास त्यांना अपलोड आवश्यक नाही. तसेच,**<br>*** सामाजिक / वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला महाराष्ट्रातील असणे आवश्यक आहे.**<br><br>**ब) Allotment नंतर प्रत्यक्ष प्रवेशावेळी-Upload+Submit**<br>१. इ.१०वी माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला<br>२. विद्यार्थ्याचे इयत्ता.१०वी चे गुणपत्रक.<br>३. स्वत:चा जातीचा दाखला (वडीलांचा अपलोड केलेला असल्यास)<br>४. Non-Creamy Layer (NCL) प्रमाणपत्र<br>**आपणास लागू असणारी प्रमाणपत्रे / दाखले वेळेत मिळवून ठेवणे हिताचे आहे.** |
| ८ | आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थी खुल्या प्रवर्गातून प्रवेशित होत असल्यास पडताळणी | *प्रवेशावेळी आवश्यक सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित विद्यालयांनी काळजीपूर्वक करुन त्यानंतरच प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.<br>*खुल्या प्रवर्गातून प्रवेश मिळाला असल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रवर्गाचे अनुषंगाने प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक असणार नाही. |
| | | |
| ९ | CAP पसंतीक्रम व त्यामध्ये बदल करणे, विशेष फेरीपूर्वी Consent Mandatory | विद्यार्थ्यांना CAP जागांवरील प्रवेशासाठी भाग-२ अर्जामध्ये किमान-१ व कमाल-१० कनिष्ठ महाविद्यालयांच्या नावांना पसंती देता येते.<br>१. सदर पसंती नोंदविलेनंतर तो भाग-२ अर्ज नियमित फेऱ्या १, २, ३ मध्ये बदल नसल्यास कायम राहील. तथापि विद्यार्थ्यांना त्यामध्ये प्रत्येक फेरीपूर्वी बदल करता येईल.<br>२. विशेष फेरीपूर्वी मात्र ऑनलाईन संमती देऊन पसंतीक्रम कायम करणे आवश्यक राहील. अन्यथा असे अर्ज विशेष फेरीमध्ये विचारात घेतले जाणार नाहीत.<br>भाग-२ CAP पसंती पुन्हा भरुन लॉक करणे (Consent) बंधनकारक असेल. |

| | | |
|---|---|---|
| १० | CAP Allotment नंतर **Proceed for Admission** | १. प्रवेश फेरीमध्ये Allotment नंतर प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास Student Login मध्ये विद्यार्थ्याने Proceed for Admission क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयाशी संपर्क साधून आपला प्रवेश घ्यावा.<br>२. केवळ Proceed केले म्हणजे प्रवेश झाला असे होत नाही हे लक्षात घ्यावे. चुकीने Proceed for Admission केले असल्यास Undo Proceed करण्याची सुविधा विद्यार्थी लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ११ | प्रवेशावेळी विद्यालयांनी तपासावयाच्या बाबी. | १. इ.११वी मध्ये प्रवेश देण्यासाठी निकषानुसार सदर विद्यार्थी पात्र आहे काय याची खात्री करणे.<br>२. इ.१०वी अथवा समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक तपासून तेच गुण अर्जात नमूद असलेचे तपासणे, तसेच यापूर्वीची शाळा सोडल्याचा मूळ दाखला तपासून घेणे.<br>३. विद्यार्थ्यास प्रवेश कोणत्या प्रवर्गातून झालेला आहे त्यानुसार संबंधित कागदपत्रे/ पुरावे (मार्गदर्शन केंद्रांने तपासलेले) पुनश्च तपासून खात्री झालेनंतरच संबंधितांचा प्रवेश निश्चित करावा.<br>४. अलॉटमेंट नंतर उर्वरित कागदपत्रे अपलोड करण्याची संधी विद्यार्थी लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. त्यानुसार मूळ प्रमाणपत्रे तपासून विद्यालयांना ती Verify करता येतील. |
| १२ | प्रवेश देणाऱ्या उच्च माध्यमिक विद्यालयांनी प्रवेशासाठी करावयाची पूर्वतयारी | १. प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालयांनी **Online Admission** तसेच **Digital Payment** ची सुविधा उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही करावी. कोणत्याही कारणासाठी गर्दी करणे टाळून सुरक्षित कार्यपद्धतीनुसार प्रवेश निश्चित करता येतील अशा सुविधा विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.<br>२. विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश विद्यालयात कशाप्रकारे निश्चित करावेत, याबाबतची आपले विद्यालयाची प्रवेशाबाबत सविस्तर कार्यपद्धती, संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयांनी स्पष्ट व थोडक्यात इ.११वी प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर **Process for Admission** अंतर्गत नोंदवावी. त्याप्रमाणे प्रवेशावेळी कार्यवाही विद्यार्थी अचूक करु शकतील.<br>३. प्रवेशासाठी आवश्यकतेप्रमाणे कागदपत्रांची काळजीपूर्वक तपासणी करावी परंतु अन्य अनावश्यक माहिती जसे पुन्हा वेगळा अर्ज भरणे, अनावश्यक कागदपत्रांचा आग्रह धरणे टाळावे. विद्यार्थ्याने अपलोड केलेली कागदपत्रे मूळ कागदपत्रे त्यांसोबत पडताळून पाहावीत व प्रवेश निश्चित करावेत आणि प्रवेशाची कार्यपद्धती व कालावधी विद्यार्थ्यांना व्यवस्थित समजावून सांगावी.<br>४. चुकीच्या अथवा पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश होणार नाही याबरोबरच कोणा योग्य व पात्र विद्यार्थ्यास प्रवेश नाकारला (Reject) जाणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रवेश नाकारताना त्याबाबत संपूर्ण खात्री करुन स्पष्ट कारणे नमूद करावीत.<br>५. प्रवेश अर्जाची तपासणी करतांना पोर्टलवर दिलेल्या सूचनांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा. संपूर्ण कार्यवाही अचूक व दिलेल्या वेळेत पूर्ण करावी.<br>६. विद्यार्थ्याचा प्रवेश सुलभ होईल यासाठी शाळा, मार्गदर्शन केंद्र, उच्च माध्यमिक विद्यालये, पालक यांनी समन्वय राखून विद्यार्थ्यांस प्रवेशासाठी मदत करावी. प्रवेशाचे नियम सर्वांनी समजावून घ्यावे. |
| १३ | **Withdrawal of Application-** | १. ज्या विद्यार्थ्यांना इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतून बाहेर जायचे असेल अथवा इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावयाचा असेल (अर्थात ज्यांना आपला भरलेला अर्ज रद्द करावयाचा आहे) त्यांनी आपला अर्ज मागे घेण्यासाठी Withdrawal of Application या सुविधेचा वापर करावा. त्यावर क्लिक केल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचा अर्ज सिस्टम मधून रद्द (Decactivate) होईल.<br>सर्व सूचना काळजीपूर्वक वाचा व पुढे जा. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी वाढतील.<br>२. जर एखाद्या विद्यार्थ्याने चुकीने Withdraw Application बटन क्लिक केले असेल तर असे अर्ज पुन्हा UnWithdraw करण्याची सुविधा शिक्षण उपसंचालक लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १४ | **Unblock Seat Number** | एखाद्या विद्यार्थ्यास Student Registration करतांना असे निदर्शनास आले की आपला इ.१०वी परीक्षेचा आसन क्रमांक यापूर्वीच कोणीतरी वापरलेला आहे त्यामुळे नोंदणी होत नसेल तर, अशा बाबतीत Unblock Seat Number ही सुविधा मार्गदर्शन केंद्र व संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. त्याचा वापर करतांना तो नंबर यापूर्वी कोणी वापरला यांची संपूर्ण खात्री करुनच Unblock करावा. Seat No. Unblock केल्यानंतर त्या नंबरवर भरलेला मूळ अर्ज रद्द होईल. |
| १५ | ATKT पात्र विद्यार्थ्यांसाठी इ.११वी प्रवेश. | १. ATKT विद्यार्थ्यांना इ.१०वी पुरवणी परीक्षेच्या निकालानंतर अर्ज (Part-१) भरणे तसेच विकल्प (Part-२) भरण्याची सुविधा देण्यात येईल.तसे वेळापत्रकात नमूद असेल.<br>२. इ.१०वी मध्ये ATKT सवलत मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी **विशेष फेरीनंतर** स्वतंत्र फेरीचे आयोजन करण्यात येईल. (शा.नि. दि.०७/०३/२०१९). |

विभागीय प्रवेश समिती सदस्य व इतर तज्ज्ञ/अनुभवी व्यक्तिंची मते जाणून घ्यावीत व आलेल्या सूचना संचालनालयास वेळोवेळी कळवाव्यात. सोबत दिलेल्या सूचना तसेच यापूर्वी दिलेल्या सूचनांनुसार संपूर्ण कार्यवाही करणेत यावी. सदर परिपत्रक २०२३-२४ इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी जारी करणेत येत आहे.

**(प्रसाद कालगावकर)**
**सहायक संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**प्रत, माहितीस्तव.**
**विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद, लातूर व कोल्हापूर.**